# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर.
## समाज विकास विभाग
'ए' विंग, चौथा माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, नागपूर महानगरपालिका,
सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१. E-Mail - swdnmc123@gmail.com


## स्वारस्य अभिरूची (EOI) सूचना

समाज विकास विभाग, महानगरपालिका नागपूर मार्फत नागपूर शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिला / मुलींना हेल्थकेअर सेक्टरमधील जनरल ड्युटी असिस्टंट या विषयात कौशल्य प्रशिक्षण देण्याकरिता इच्छूक कौशल्य प्रशिक्षण संस्था / कंपनी यांचे मार्फत www.mahatenders.gov.in या संकेत स्थळाच्या माध्यमातून स्वारस्य अभिरूची (EOI) मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Sector Name | Sub Sector Name | Course Name | Course Code | NSQF Level | No. of Student | Total Project Cost |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Healthcare | Allied Health & Paramedics | General Duty Assistant | HSS/Q5101 | 3 | 90 | 21,54,600/- |

❖ **सदर संस्था/ कंपनी यांना करावयाची कार्ये :-**

१) प्रशिक्षण वर्गाकरिता प्रशिक्षणार्थ्यांची निवड करतांनी तो नागपूर महानगरपालिका हद्दीतील असावा, याकरिता प्रशिक्षणार्थ्यांचे आधार कार्ड ग्राह्य धरण्यात यावे.

२) प्रशिक्षणार्थी हे १८ ते ४५ वर्ष या वयोगटातील असणे बंधनकारक राहील.

३) Healthcare Sector Skill Council द्वारे उपलब्ध करून दिलेल्या Model Curriculum मध्ये नमूद केल्यानुसार प्रशिक्षणार्थ्यांचे शिक्षण ग्राह्य धरून नोंदणी करण्यात यावी.

४) प्रशिक्षणार्थ्यांची नोंदणी करण्याकरिता अर्जाचा नमुना (Format) समाज विकास विभागाच्या समन्वयाने तयार करणे बंधनकारक राहील.

५) प्रशिक्षण वर्ग तयार करण्याकरिता प्रशिक्षणार्थ्यांची जुळवाजुळव (Mobilization) करण्याकरिता झोन निहाय Mobilization Camp आयोजित करणे, प्रशिक्षणार्थ्यांचे समुपदेशन करणे, प्रशिक्षणार्थ्यांचे कौशल्य प्रशिक्षण संस्थेला भेटी घडविणे, प्रशिक्षणार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देणे, त्यांचे समुपदेशन करणे. तद्नंतर प्रशिक्षण वर्गाची यादी निश्चित करणे. सदर यादी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या समुदाय संघटकांमार्फत विभागाकडून मान्यता प्राप्त झाल्यावर प्रशिक्षण वर्ग सुरू करणे.

६) प्रशिक्षणार्थ्यांची दैनंदिन स्वरूपात Aadhar-Linked Attendance / Biometric Attendance व Manual Attendance घेणे बंधनकारक राहील व देयक सादर करतांनी सदर हजेरी अहवालासहीत विभागाला सादर करणे बंधनकारक राहील.

७) कौशल्य प्रशिक्षण संस्थेने प्रशिक्षण वर्गाची वेळ निश्चित केल्याप्रमाणे दररोज प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण वर्ग सुरू केल्यानंतर व प्रशिक्षण वर्ग संपुष्टात येतानी दैनंदिन स्वरूपात Biometric हजेरी व Manual हजेरी घेणे बंधनकारक राहील.

८) प्रशिक्षणा दरम्यान वेळोवेळी संस्थे मार्फत मुल्यांकन घेणे व विद्यार्थ्यांचे अभिप्राय अर्ज गोळा करणे.

९) प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना सर्व सोई-सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. (उदा. पार्किंग, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छता, दिव्यांगांकरिता Ramp, शौचालय इत्यादी.)



Scanned with OKEN Scanner

१०) कौशल्य प्रशिक्षण संस्थांना National Skill Qualification Framework (NSQF), Healthcare Sector Skill Council यांच्यामार्फत मान्यताप्राप्त Model Curriculum प्रमाणे प्रशिक्षण उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

११) कौशल्य प्रशिक्षण संस्थांची Training Partner (TP) निवड एका वर्षासाठी असेल. संस्थेचे कार्य, उपलब्ध निधी यांचा विचार करून कालावधी वाढविण्याचा अथवा प्रशिक्षण वर्ग देण्याबाबतचा विचार केला जाईल. सदर अधिकार मा. अति. आयुक्त (सेवा) यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

१२) सदर विषयाचे मुल्यांकन IGMC / Healthcare Sector Skill Council / त्रयस्थ संस्था यांच्यामार्फत करणे बंधनकारक राहील. मुल्यांकनाचे देयक संस्थेला आपल्या स्तरावर अदा करणे बंधनकारक राहील.

१३) दैनंदिन स्तरावर कमीत कमी ४ तास व एकूण कमीत कमी २२० तास प्रशिक्षण वर्ग घेणे बंधनकारक राहील. सदर प्रशिक्षणा दरम्यान सॉफ्ट स्कील, इंडस्ट्रीयल व्हिजीट, अतिथी व्याख्यान, ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) इत्यादी अंतर्भूत असतील.

१४) मुल्यांकन पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांपैकी ७० टक्के प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. देयक सादर करतांनी Appointment Letter, Joining Letter, Salary Sleep, Payment Bank Details इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

१५) निवड करण्यात आलेल्या संस्था/कंपनीला महानगरपालिकेसोबत सदर कार्य करण्याबाबत शासनाचे नियमानुसार स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक राहील.

❖ **आवेदनकर्त्याकरिता आवश्यक असलेले निकष खालीलप्रमाणे :-**

१) सामाजिक संस्था, अशासकीय संस्था प्रचलित नियमानुसार नोंदणीकृत असावी.

२) **www.ngodarpan.gov.in** या संकेत स्थळावरील नोंदणी ID आवेदनासोबत संलग्न करणे बंधनकारक राहील. नोंदणी प्रमाणपत्र संलग्न करावे लागेल.

३) संस्था/ कंपनीचे मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण सनदी लेखापाल (CA यांची स्वाक्षरी व शिक्का सह) मार्फत केलेले असावे. (२०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५)

४) संस्था/ कंपनीचे मागील ३ वर्षाचे शासनाकडे आयकर भरलेले (CA यांची स्वाक्षरी व शिक्का सह) कागदपत्रे असावी.

५) GST नोंदणी प्रमाणपत्र (देयक अदा करतांनी GST प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील), पॅन कार्ड संलग्न करणे बंधनकारक राहील.

६) संस्था/ कंपनीच्या खात्यात किमान रू. **२.०० कोटी** शिल्लक रक्कम असणे आवश्यक आहे. किंवा सदर संस्था/ कंपनीची मागील दोन वर्षाची आर्थिक उलाढाल किमान रू. **२.०० कोटी** CA प्रमाणित असावी. (CA यांची स्वाक्षरी व शिक्का सह)

७) संस्था/ कंपनीने मागील सहा महिन्याचे बँक स्टेटमेंट देणे आवश्यक राहील.

८) प्रशिक्षकांचे कागदपत्रे संलग्न करणे बंधनकारक राहील. (संस्थे मार्फत नियुक्ती पत्र, Resume, शैक्षणिक कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्र इत्यादी)

९) Training Partner (TP) चे Training Center (TC) स्वः मालकीचे नसल्यास, Training Center (TC) सोबत झालेल्या सामंजस्य कराराची (MoU) प्रत संलग्न करणे बंधनकारक राहील.



Scanned with OKEN Scanner

१०) कौशल्य प्रशिक्षण संस्थांचे Training Partner (TP) यांना शासकीय योजनेत (DAY-NULM/ NRLM/ NSDC/ DDUJKY/ PMKVY / MSSDS / DPC) कौशल्य प्रशिक्षण देण्याचा किमान १ वर्षाचा अनुभव तसेच सदर १ वर्षात कमीत कमी १००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले असावे.

११) मुद्दा क्र. १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे ७० टक्के प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार / स्वयंरोजगार उपलब्ध करून दिल्याचा पुरावा / हमीपत्र संलग्न करणे बंधनकारक राहील.

१२) कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण संस्था यांनी संस्था / कंपनी / Placement Agency यांच्या सोबत किमान ५ सांमजस्य करार (MoU) / Tie-up केल्याबाबतचे कागदपत्रे संलग्न करणे बंधनकारक राहील.

१३) कौशल्य प्रशिक्षण संस्थेमधील कोर्सकरिता लागणाऱ्या साहित्याची यादी (Equipment List) व इतर सुविधा उपलब्ध असल्याबाबतचे प्रशिक्षण संस्थेचे छायाचित्र (Geo-Tag Photo) जोडणे बंधनकारक आहे.

१४) स्वारस्य अभिरूची (EOI) मध्ये नमूद असलेले सेक्टर व कोर्स याबाबतचे Model Curriculum सोबत संलग्न करणे बंधनकारक राहील.

१५) कौशल्य प्रशिक्षण संस्था/ कंपनी शासनाच्या/ न्यायालयाच्या कायदेशीर प्रकरणात विवादित नसावी, तसेच संस्था/ कंपनी काळ्या यादीमध्ये समाविष्ट केलेली नसावी. संस्था त्या वेळी अंमलात आलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धादोषी नसल्याचे स्वयंघोषणापत्र सोबत जोडणे आवश्यक राहील. त्याबाबत प्रतिज्ञापत्र रू. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर असावे. तसेच लोकप्रतिनिधी सोबत कुठलाही आर्थिक संबंध नसल्याबाबतचे शपथपत्र (परिशिष्ट 'अ') रू. ५०० च्या स्टॅम्प पेपरवर जोडावे लागेल.

१६) सदर स्वारस्य अभिरूची (EOI) च्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संपूर्ण स्वारस्य अभिरूची (EOI) चा सेट स्वाक्षरी करून आवेदनासोबत ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहील.

१७) स्वारस्य अभिरूची (EOI) ची वैधता कालावधी EOI उघडल्याच्या दिनांकापासून ३६५ दिवसाचा राहील. तसेच काम करण्याचा कालावधी कार्यादेश दिल्यापासून एक वर्षाकरिता राहील.

१८) **देयकाबाबतचे टप्पे :-**

i. प्रथम टप्पा - प्रशिक्षण वर्ग सुव्यवस्थितरित्या सुरू झाल्यावर विभागाच्या अहवालाच्या आधारावर १५ दिवसानंतर संस्थेमार्फत देयके सादर केल्यावर महानगरपालिकेच्या प्रक्रियेन्वये ५० टक्के देयक अदा करण्यात येईल.

ii. द्वितीय टप्पा - प्रशिक्षण वर्गाचे मुल्यांकनाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याच्या आधारावर (उत्तीर्ण झालेल्या मुलांचे) तसेच ७० टक्के प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करून दिल्याबाबतचे पुरावे संलग्न करणे (उदा. Appointment Letter, Joining Letter, Salary Sleep, Payment Bank Details etc.) संस्थेमार्फत देयके सादर केल्यावर महानगरपालिकेच्या प्रक्रियेन्वये ५० टक्के देयक अदा करण्यात येईल.

उपरोक्त देयकात विद्यार्थ्यांची जुळवा-जुळव (Mobilization), त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यांकन (Third Pary Evaluation), प्रशिक्षणाचे साहित्य (Training Material) इत्यादी यातच अंतर्भूत असेल. स्वारस्य अभिरूची (EOI) मध्ये नमूद केलेल्या दराव्यतिरिक्त कोणतेही देयक अनुज्ञेय असणार नाही.

१९) अनु. क्र. १८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक घटक निहाय देयक सादर करतांनी अहवालासोबत कामगिरीपूर्वीचे व कामगिरीनंतरचे दिनांकात व अक्षांश-रेखांशासह फोटो व प्रशिक्षणाचे geo-tag Short Video सादर करणे बंधनकारक राहील.

२०) परिस्थितीनुसार योग्य त्या नविन अटी करारनाम्यामध्ये समाविष्ट करण्याचे अथवा त्यानंतर एखाद्या नियमात फेरफार करण्याचा अथवा पूर्णपणे वगळण्याचा संपूर्ण अधिकार महानगरपालिकेनो राखून ठेवलेला आहे.



Scanned with OKEN Scanner

२१) नियमावलीत बदल करण्याबाबतचे सर्व अधिकार राखून ठेवण्यात आले आहे. तसेच स्वारस्य अभिरूची (EOI) मधील अटी व शर्ती आणि कर्तव्य व कार्यसूची मध्ये नमूद केलेल्या शब्दावलीचा शब्दशः अर्थ काढण्याबाबतचे सर्व अधिकार राखून ठेवण्यात आले आहे.

२२) कौशल्य प्रशिक्षण संस्थेकडे कार्यादेश मिळण्यापूर्वी अथवा कार्य करीत असतांनी प्रशिक्षण विषयासंबधी साहित्य उपलब्ध नसल्यास व इतर सुविधा उपलब्ध नसल्यास, तसेच संस्था/ कंपनीचे काम समाधानकारक नसल्यास करार रद्द करण्यात येईल.

२३) कौशल्य प्रशिक्षण संस्थेमार्फत मागील १ वर्षात केलेल्या कार्याचे व ज्या विषयात प्रशिक्षण देणार आहे, त्या प्रशिक्षण वर्गातील देण्यात येणाऱ्या रोजगार बाबतचे नियोजन निवड समिती समोर सादर करणे बंधनकारक राहील.

२४) वरील नियमात बदल करण्याचे अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेले आहे. तसेच स्वारस्य अभिरूची (EOI) प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर आवेदने रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांच्याकडे राखून ठेवलेले आहे.

उपरोक्त निकषाच्या आधारे आपला सर्वंकष प्रस्ताव दि. 11/12/२०२५ ते दि. 17/12/२०२५ या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या सांकेतिक स्थळावर संगणीकृत पद्धतीने (Online) सादर करावा.

**टिप :- महानगरपालिकेच्या समाज विकास विभागात (Offline) प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही.**

**उपायुक्त (सविवि)**
**महानगरपालिका, नागपूर.**

Scanned with OKEN Scanner